मा. उच्च न्यायालय यांनी रिट पिटीशन क्रं.४३१८/२०२५ मध्ये दिनांक १५.१२.२०२५ रोजी पारीत केलेल्या आदेशान्वये प्रतिवादी क्रं.१ व ३ यांना वादी तर्फे साक्षीदार क्रं.१ यांचा उलटतपास घेण्यास परवानगी देण्यात आली आहे.

**सबब वादीतर्फे साक्षीदार क्र. १ यांचा उलटतपास प्रतिवादी क्रं.१ व ३ चे वकिल श्रीमती डी.आर. टेंबले यांचे मार्फत शपथेवर सुरू —**

१२. हे म्हणणे खरे नाही की, मला माझा हिस्सा मिळालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, या दाव्यातील वाद मिळकत ही माझे वडीलांच्या नावे सामुहिक उत्पन्नातुन विकत घेण्यात आली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे वडीलांनी सामुहीक उत्पन्नातुन विकत घेतलेला प्लॉट विकला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी संयुक्त कुंटूबातील मिळकत माझे नावे करून घेतली व ती विकली. मी माझी मिळकत ९ डीसेंबर, २०२२ रोजी गजानन गावंडे यांना विकली आहे. हे म्हणणे खरे नाही की, ती मिळकत आमच्या कुंटूबाची संयुक्त मालकीची मिळकत होती. हे म्हणणे खरे नाही की, मला आमच्या कुंटूबाच्या संयुक्त मालमत्तेमधील माझा हिस्सा मिळालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी विकलेल्या प्लॉटबाबत न्यायालयात नियमीत दिवाणी दावा क्रं.७४/२०२० हा दावा सुरू आहे. हे म्हणणे खरे नाही की, तो दावा हा आमच्या कुंटूबाच्या सामुहीक उत्पन्नातुन विकत घेतलेल्या प्लॉटबाबत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला
फेरतपास काही नाही.

माझे समक्ष/श्रवणोत्तर स्विकृत,

स्वा/—

दिनांक ०२.०१.२०२६.

( महेश एस. काळे )
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
अकोट.